MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक – दिपक थोरात



## तिन मराठ्यांमध्ये माधव निर्मळ मारणार बाजी

वडवणी शहर प्रतिनिधी (करण सरवदे )

माजलगाव मतदार संघामध्ये ओबीसी नेतृत्व म्हणून माधव निर्मळ यांची ओळख आहे मराठा समाजाच्या तीन नेत्यांमध्ये माधव निर्मला ची माजलगाव मतदार संघातील अनेक जाती धर्मातील लोकांची अठरापगड जातीच्या लोकांना हवा असणारे नेतृत्व म्हणून महादेवा यांच्याकडे पाहिले जाते

माधव निर्मळ ज्या पक्षाचे काम करतात त्या पक्षाची त्यांना उमेदवारी मिळण्याची शक्यता फार कमी आहे परंतु लोकसभा निवडणुकीत निष्ठेने पंकजाताई मुंडे यांचे त्यांनी काम केले यामुळे वंजारी समाजात त्यांच्याविषयी सहानुभूती आहे व माळी व इतर मायक्रो समाजाला मागील काळात घरापासून ते गावापर्यंत प्रचंड त्रास झालेला आहे यामुळे ओबीसी देखील संघटीत झालेले आहेत या परिस्थितीत तीन मराठा एक मुस्लिम दगडा उमेदवार असलेले माजलगाव मतदार संघात महादेव निर्मळ सहज निवडून येऊ शकतात

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०२ | अंक –३२ | शनिवार दि.१९ ऑक्टोबर २०२४ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -32 | SATURDAY DT.19 OCTOBER 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# गेवराईच्या राजकारणात मराठा ओबीसीच्या वादात पवार पंडितांना मोठा फटका बसणार!

## गेवराई विधानसभा निवडणुकीत पवार विरुद्ध पंडित असा तिरंगी सामना रंगणार!
## प्रियंका खेडकरर महेश दाभाडेमुळं गेवराईचे राजकारण तापणार!







### ●जातीपातीच्या वातावरणात कोण उधळणार गुलाल? जनतेच्या मनातील आमदार कोण?

### ● गेवराई मतदारसंघातील जनता कोणाला बसवणार आमदारकीच्या खुर्चीवर?

गेवराई प्रतिनिधी - (महाराष्ट्र आरंभ) महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले असून, केंद्रीय निवडणूक आयुक्तांनी राज्यातील विधानसभा निवडणुकीची घोषणा करताच गेवराई तालुक्यातील सर्व पक्षाचे नेते, कार्यकर्ते कामाले लागले आहेत. मागील काही दिवसांपासून सर्व पक्षाचे नेते मतदारसंघात फिरत असून मतदारांशी चर्चा करत संवाद साधत आहेत. संकटकाळी सोबत नसणारे नेते आज मतदारांशी संवाद साधत गावभेटी देत आहे. तसेच एकेकाळी पवार विरुद्ध पंडित आणि पुढे पंडित विरूद्ध पवार तर १० वर्षांपासून पुन्हा पवार विरुद्ध पंडित असा राजकीय सामना असलेल्या गेवराई मतदारसंघात पवार विरुद्ध पंडित असा तिरंगी सामना रंगणार हे निश्चित आहे. सध्याच्या काळात जातीयवादाचा भोवरा जास्त फिरत आहे. तसेच लोकसभेनंतर आता पण जरांगे फॅक्टर चालणार का? याकडे पण सर्व नेत्यांचे आणि जनतेचं लक्ष लागून आहे. याच पार्श्वभूमीवर जातीपातीच्या वातावरणात गेवराई विधानसभा निवडणुकीत कोण उधळणार गुलाल याकडे गेवराई तालुक्यातील जनतेचे लक्ष लागले आहे. आता गेवराई मतदारसंघातील राजकीय समीकरणे बदलणार असून, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून माजी जिल्हा परिषद अध्यक्ष विजयसिंह पंडित यांना उमेदवारी निश्चित मानली जात आहे. व शिवसेना उद्धव ठाकरे गटाकडून बदामराव पंडित यांना उमेदवारी निश्चित असून भाजप आमदार लक्ष्मण पवार यांनी भाजपकडे दुर्लक्ष करून राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या संपर्कात आहेत. आता लक्ष्मण पवार कोणत्या पक्षाकडून निवडणूक लढवणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आणि येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत विकास कामांसाठी आणि तळागाळातील गोरगरीब जनतेच्या हक्कासाठी लढणारा अशा नेत्यांना गेवराई विधानसभा निवडणुकीत संधी देणार असल्याचे मतदारसंघातील जनतेतून बोलले जात आहे. येणाऱ्या या २०२४ च्या निवडणुकीत पवार विरुद्ध पंडित अशी मोठी फाईट होणार असून यामधून गेवराई मतदारसंघातील जनता कोणत्या नेत्याला आमदारकीच्या खुर्चीवर बसवून गुलालाची उधळण करणार आहे हे देखील पाहणं



तितकंच महत्त्वाचं ठरणार आहे. सर्व सामान्य जनतेच्या हितासाठी आणि हक्कासाठी लढणारा नेत्याला सर्व सामान्य जनतेची पसंती आहे. यामुळे या निवडणुकीत कोण मारणार बाजी याकडे आतापासूनच सर्व सामान्य जनतेचे लक्ष लागले आहे.

गेवराई मतदार संघाच्या राजकारणामध्ये पंडित विरुद्ध पवार आणि पवार विरुद्ध पंडित असाच सामना आज पर्यंत पाहायला मिळाला होता परंतु मराठा समाजाचे आरक्षणाचे जनक मनोज दादा जरासे पाटील यांच्या आंदोलनामुळे गेवराई मतदार संघातील मराठा समाज हा खडबडून जागा झालेला आहे तर ओबीसी चे नेतृत्व करत असताना प्राध्यापक लक्ष्मण हाके यांच्यामुळे गेवराई मतदार संघामधील ओबीसी समाज ही आता रस्त्यावर उतरला आहे आणि येणाऱ्या निवडणुकीमध्ये पंडित विरुद्ध पवार यांच्यात सामना पाहायला मिळत होता परंतु आता ओबीसीच्या उमेदवार म्हणून प्रियंका शिवप्रसाद खेडकर ह्या चर्चेमध्ये आलेल्या आहेत आणि त्यांना गेवराई मतदार संघातील ओबीसी मराठा समाज चांगल्या पसंती देत आहे तर यावेळी मराठा आरक्षणाचे जनक मनोज दादा जरांगे पाटील यांचे निकटवर्ती म्हणून महेश दाभाडे माजी नगराध्यक्ष यांची गेवराई मतदारसंघांमध्ये एक परिचित चेहरा असून त्यांचेही नावाला पसंती येत आहे त्यामुळे गेवराई मतदार संघात बदामराव पंडित लक्ष्मण पवार व विजयसिंह पंडित यांची तिरंगी लढत होण्या ची शक्यता होती परंतु प्रियंका शिवप्रसाद खेडकर व महेश दाभाडे यांच्यामुळे ही तिरंगी लढत विरुद्ध ओबीसी मराठा या वादामध्ये आता गेवराईचे आमदार कोण होतं हे पाहणे गरजेचे आहे.

## परळीत धनंजय मुंडेच्या विरोधात नेमका कोण ?

परळी (प्रतिनिधी)

परळी मतदारसंघात मंत्री धनंजय मुंडे यांनी प्रचारात आघाडी घेतली असून गुरुवारी त्यांनी मतदाराची येथे संवाद साधला त्यांच्या विरोधात कोण नेमका कोण असेल कोण असेल हे अद्याप स्पष्ट झालेला नाही. राजेभाऊ फड यांचे नाव आघाडीवर असून त्यांनाच शरद पवार पक्षाकडून पसंती मिळणार आहे असे संकेत परळी मतदारसंघात दिसून येत आहेत. या मतदारसंघात दोन्ही उमेदवार ओबीसी असल्यावर मराठा समाज नेमकी कोणती भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. यामध्ये जरांगे फॅक्टर जर उमेदवार दिला तर तो चेहरा राजेसाहेब देशमुख .यांनाच पहिली पसंती राष्ट्रवादी काँग्रेस. शरद पवार गटाकडून मिळेल अशी शंका वाटू लागली आहे मराठा समाजाच्या मतदार यांनी जर दोन्ही ओबीसी





उमेदवार असतील तर ज्यांच्याकडे जरंगे फॅक्टर चालणार आहे तोच उमेदवार विजय होण्याचे मार्ग दिसून येत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांच्याकडून एकमेव उमेदवार राज्याचे कृषिमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री. धनंजय मुंडे. यांचीच वर्णी लागल्यामुळे पुढील उमेदवार मिळेपर्यंत विडा सुटेपर्यंत अडचणी निर्माण होत आहेत. यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटामध्ये उत्साही उमेदवार बरेच असल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार हे कोणाला पसंती देतात त्यावर परळी तालुक्याचे लक्ष लागले आहे. परळी मतदारसंघात विकास पुरुष कामाचा माणूस आपला माणूस कहो दिल से धनंजय मुंडे फिरसे आशा घोषणा परळी तालुक्यात ऐकायला सध्या तरी मिळत आहेत.




बीड ( प्रतिनिधी ) : बीड जिल्हा गुरुकुल असोसिएशनच्या वतीने मासिक बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विविध विषयावर विचारमंथन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या प्रथम सत्र परीक्षेच्या अनुषंगाने चर्चा करण्यात आली. यावेळी संघटनेचे अध्यक्ष श्री इंगोले सर, सचिव तुपे सर, कोषाध्यक्ष वाघमारे सर तसेच गुरुकुलचे संचालक या वेळी उपस्थित होते.

# सन्मान वाटा न मिळाल्यास समाजवादी पक्ष बीड जिल्ह्यातील सर्व मतदारसंघात उमेदवार देणार : खमरूल इमान खान

## सन्मान वाटा न मिळाल्यास समाजवादी पक्ष बीड जिल्ह्यातील सर्व मतदारसंघात उमेदवार देणार : खमरूल इमान खान

बीड (प्रतिनिधी)

समाजवादी पक्ष हे इंडिया आघाडीतील घटक पक्ष आहे लोकसभा निवडणुकीत समाजवादी पक्षांनी उत्तर प्रदेश मध्ये भाजपाला पराभव करण्यात महत्त्वाची योगदान दिले महाराष्ट्राची समाजवादी पक्ष हे इंडिया आघाडी ज्याला महाराष्ट्रात महाविकास आघाडी म्हणतात यामध्ये सहभागी आहे परंतु महाविकास आघाडी कडून सन्मान वाटा न देण्याचे संकेत मिळत असल्याने प्रदेशाध्यक्ष मा. अबु असीम आजमी यांनी स्वबळावर निवडणूक लढण्यास तयार राहण्याची सूचना राज्यातील कार्यकर्त्यांना दिली असून बीड जिल्ह्यात समाजवादी पक्ष स्वबळावर निवडणूक लढण्याची तयारी करीत आहात राज्यात जर पक्षाला सन्मान वाटा दिला नाही तर बीड जिल्ह्यातील सहा ही मतदारसंघात समाजवादी पक्ष आपले उमेदवार देणार असल्याची घोषणा समाजवादी पक्ष जिल्हाध्यक्ष खमरूल ईमान खान यांनी केली आहे पक्षाचे धोरणानुसार २६ तारखेला बीड जिल्ह्या बाबत निर्णय घोषित करण्यात येणार असल्याचे त्यांनी प्रसिद्धी पत्रकार सांगितले आहे.

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने समाजवादी पक्षाचे अध्यक्ष माननीय अखिलेश जी यादव यांनी १८ आणि १९ तारखेला महाराष्ट्राचा दौरा केला आहे या निमित्ताने त्यांनी राज्यातील चार विधानसभा मतदारसंघात समाजवादी पक्षाचे उमेदवारांची घोषणा केली आहे ज्यामध्ये मानखुर्द मतदारसंघात मा. अबुल असीम आजमी भिवंडी पूर्व मतदारसंघात विद्यमान आमदार रईस शेख तर भिवंडी पश्चिम मतदार संघात रियाज आणि मालेगाव मतदारसंघात ससाने यांचे उमेदवारीची घोषणा करण्यात आली आहे प्रदेश अध्यक्ष यांनी सर्व जिल्हाध्यक्षांना सूचना केली आहे की महाविकास आघाडी शी पक्षांनी १२ मतदारसंघाची मागणी केली आहे जर पक्षाला सन्मान वाटा देण्यात येत आहे तर पक्ष महाविकास आघाडीत राहणार आहे अन्यथा स्वबळावर राज्यात निवडणूक लढविले जाणार असून सर्वांनी याबाबत तयारी करावी या निमित्ताने बीड जिल्हा अध्यक्ष खमरूल ईमान खान यांनी जिल्ह्याचा आढावा घेत पक्ष कार्यालय बीड जिल्ह्यातील मतदार संघाबाबत अहवाल सादर केला आहे आणि सहाही मतदारसंघात आपले उमेदवार देण्याची तयारी दर्शविली आहे बीड माजलगाव गेवराई आष्टी पाटोदा परळी आणि केज अंबाजोगाई मतदारसंघात पक्ष आपले उमेदवार देणार असून बीड गेवराई आणि केज मतदार संघात उमेदवार हे ठरविण्यात आले आहे ज्याची घोषणा २६ तारखेला करण्यात येतील परंतु यादी जर पक्षाचेवतीने महाविकास आघाडीत राहण्याचे सूचना केली तर पक्षाचे आदेशाचे पालन केले जाईल अन्यथा समाजवादी पक्ष बीड जिल्ह्यात पूर्ण ताकदीने निवडणूक लढविणार



असल्याची माहिती प्रसिद्धी पत्रकार द्वारे समाजवादी पक्षाचे जिल्हा अध्यक्ष खमरूल इमान खान यांनी दिली आहे



## वंचित बहुजन आघाडी पक्षाकडून बीड विधानसभेसाठी पुरुषोत्तम वीर, तर केज साठी डॉ.नितीन सोनवणे इच्छुक

बीड (प्रतिनिधी)

वंचित बहुजन आघाडीने आत्तापर्यंत महाराष्ट्रातील ५१ जागांची यादी जाहीर केली आहे, प्रचारासाठी वेळ कमी असल्यामुळे आता पुढील यादी लवकरच जाहीर होईल. वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष एड. प्रकाश आंबेडकर, प्रदेश अध्यक्ष रेखाताई ठाकूर यांच्याकडे बीड व केज साठी वीर व सोनवणे यांनी उमेदवारीची मागणी केली आहे. पक्ष जो निर्णय घेईल तो आम्हाला मान्य आहे,असे त्यांनी सांगितले.आज पर्यंत पक्षाने जो आदेश दिला आहे तो ऐकला आहे व त्या पद्धतीने काम केले आहे.

बीड जिल्ह्यातील बीड, केज, गेवराई,आष्टी,परळी येथील उमेदवार जाहिर होणे बाकी आहे.बीड विधानसभा मतदार मतदान संघातून वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष पुरुषोत्तम वीर यांनी पक्षाची इच्छुक उमेदवारी अर्ज करून मागणी केली आहे. ते गेल्या आनेक वर्षां पासून काम करत आहे.

तर केज विधानसभा मतदान संघातून वंचित बहुजन आघाडीचे नासिक जिल्हा प्रभारी डॉ.नितीन सोनवणे यांनी देखील, मुंबई येथील प्रदेश कार्यालयात जाऊन पक्ष श्रेष्ठशी चर्चा देखील केली आहे.बीड व केज साठी कोणाची वर्णी लागते याकडे सर्व जिल्ह्याचे व राजकीय पक्षाचे लक्ष आहे.वंचित बहुजन आघाडीमुळे,

# पक्ष चिन्ह नंतर पाहू आता डोअर टु डोअर घेऊ – सौ. जयश्री विधाते

आज आपल्या बीड शहरातील बालेपीर येथे अल्पसंख्याक समाजातील महिला भगिनींच्या अडीअडचणी जाणुन घेण्यासाठी जयदत्तजी आण्णा क्षीरसागर विचारमंच महिला आघाडी बीड विधानसभेच्या वतीने छोटीखानी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अल्पसंख्याक समाजातील भगीनींना संबोधित करताना महिला आघाडी प्रमुख जयश्रीताई विलास विधाते यांनी आण्णासाहेंबानी आजवर सर्व समाज घटकांना सोबत घेऊन विकासात्मक राजकारण केले त्यामुळे काकुंच्या काळापासूनच कोणता पक्ष कोणती पार्टि असा विचार न करता आपल्या हक्काचा माणुस म्हणून अल्पसंख्याक समाज सदैव आण्णासाहेंबाच्या पाठिशी खंबीरपणे उभा राहीला आहे. आत्ताच विधानसभेचे रणशिंग फुंकले गेले येत्या वीस ऑक्टोबर पर्यंत चित्र बर्यापैकी स्पष्ट होईल. सध्य परिस्थितीत रोज सोशल मिडीया आणि वर्तमान पत्रातून वेगवेगळया बातम्या झळकतात. असे असेल तरी भांबावून न जाता आपला नेता, आपला पक्ष, आपला सिम्बॉल. हे ब्रीद घेऊन पक्ष चिन्ह नंतर पाहु आधी डोअर टु डोअर घेऊ. आपण तयारीला लागलेलो आहोत, तेंव्हा न थांबता आजवर ज्या ताकदीने आपण काम करत आहोत त्यापेक्षा अधिक ताकदीने आणि जोमाने अधिकचा वेळ न दवडता सर्व कार्यकर्त्यांने,



आण्णासाहेंबावर निष्ठा प्रेम आणि विश्वास असणाऱ्या माणसांनी आजवरची विकासकामे आणि भविष्यातील संकल्पना घेऊन मतदारा पर्यंत स्वबळावर जायचे आहे. भविष्यात काय परिस्थिती असेल त्यावर त्याच वेळेस परिस्थितीनुरूप बदल करूत पण सध्या तरी एक क्षण ही न दवडता एकच मिशन विधानसभा इलेक्शन.असे आवाहन केले. यावेळी विचारमंचच्या अल्पसंख्याक सेल प्रमुख शेख अजमत सुलताना बाजी, संगीताताई शिंदे, फरजाना शेख भाभी आणि परिसरातील अल्पसंख्याक समाजातील महिला भगिनी उपस्थित होत्या.

# सहकारी-बँका व पतसंस्थानी इव्हेंन्ट करायला व प्रेझेंन्टेशन करायला हवे का?

सध्याचा काळ सर्व क्षेत्रात इव्हेंन्ट व प्रेझेंन्टेशनचा आहे.विवीध उद्योगात,व्यवसायात,कार्पोरेट, प्रायव्हेट,कर्मशियल बँकिंग सेक्टर मध्ये या साठी विशेष आर्थिक तरतुद तर केली जातेच पण यासाठी तंज्ञ स्टॉफ,एजन्सिजची ही नियुक्ती केलेली असते.या बाबत सहकार क्षेत्र फार माघे आहे.केंद्र सरकार सहकारा बाबत सकारात्मक असुन नवनवीन योजनांच्या माध्यमातुन ते लक्षात येते.देशातील,राज्यातील ३०%+ लोकसंख्या विवीध माध्यमातुन सहकाराशी जोडलेली असीनही त्याचा फायदा अथवा लाभ सहकार क्षेत्राला घेता येत नाही असे नाईलाजास्त म्हणावे लागेल.या स्पर्धात्मक कालखंडात सहकार क्षेत्राने विशेषतः सहकारातील बॅकिंग सेक्टरने या कडे लक्ष देणे गरजेचे आहे.पतसंस्था चळवळीत साधारणतः १३,०००/-+ पतसंस्था आहेत व हा या क्षेत्रातील सर्वात मोठा आकडा आहे

पतसंस्थानी प्रेझेंन्टशन व इव्हेंट मंनेजमेंट याकडे सकारात्मकपणे पहाणे अतीव गरजेचे आहे,आपली स्पर्धा खाजगी व व्यापारी बँकाशी आहे,ज्या विवीध माध्यमातुन ट्रेन व तंज्ञ स्टॉफच्या मदतीने ग्राहकां पर्यंत पोहचत आहेत.आपण यावर होणारा खर्च -खर्च न मानता गुंतवणुक मानायला हवी.संस्थेची जागा,इमारत,फर्निचर,रंगरंगोटी,स्टॉफची बैठक व्यवस्था,त्यांचे राहणीमान,त्यांची भाषा,देहबोली,त्यांची बोलण्याची पध्दत,ग्राहकांना सेवा देण्याचा उत्साह,संचालक मंडळाची मानसिकता हे व असे बरेच घटक प्रेझेंन्टेशन मध्ये येतात.यासाठी पदाधिकार्यांचा पतसंस्था भेटीसाठी प्रवास,कर्मचार्यांचे अभ्यास दौरे,प्रशिक्षण या माध्यमातुन इतर पतसंस्था काय करतात व आपण काय करायला हवे याचे चिंतन होईल.

सध्याच्या काळात टिम म्हणुन सादरीकरण फार गरजेचे आहे.आपली पतसंस्था शिपाई यांचू पासुन अध्यक्षा पर्यंत कुणालाही ,कुठेही प्रेझेंन्ट करता यायला हवी,त्यासाठी वारंवार स्टॉफ व संचालक यांच्या मिटींग मधुन व तंज्ञाच्या मार्गदर्शनाखाली योग्य सादरिकरण करणे,करता येणे हे महत्वाचे आहे.

त्याच बरोबर इव्हेंन्ट हा जनसंपर्कासाठी व ग्राहक वाढीसाठी सर्वोत्तम मार्ग आहे.आपल्या संस्कृतीत विवीध सण-समारंभ मोठ्या उत्साहाने व आनंदाने ते ही वेळ देवुन साजरे केले जातात.पतसंस्था वाढीसाठी आपणही दर दोन महिंन्यांनी संस्थेच्या,शाखांच्या जागेत कार्यक्रम आयोजीत केले पाहिजेत.प्रत्येक कार्यक्रम साजरे करताना ग्राहकांची मानसिकता ओळखुन त्यांचे नियोजन व्हायला हवे.दर कार्यक्रमातुन दरवेळी १०० नविन ग्राहक जोडण्याचे टारगेट शाखांना दयायला हवे.महिला,मुली,जेष्ठ महिला,मुले,पुरुष,जेष्ठ नागरिक यांच्या बरोबरच तृतिय पंथियां साठीही विशेष कार्यक्रम शोधायला हवेत.या कार्यक्रमानुसार विवीध स्पर्धा,व्याख्याने,सन्मानसोहळे,बक्षिस वितरण,गुणवंताचे सत्कार,महिला दिन,बालक दिन,जेष्ठ नागरीक दिन हे असे समयोजित कार्यक्रमांचे वर्षाचे कॅलेंडर तयार करुन त्या त्या कार्यक्रमास तो तो ग्राहक व भविष्यातील संभाव्य ग्राहक यानां निमंत्रित करुन संस्था समाजा पर्यंत पोहचवणे आवश्यक झाले आहे.यासाठी आपणस आता बदलावे लागेल विवीध एजन्सी,इव्हेंट मॅनेजमेंट कंपन्या,डिजीटलायझेशन व्दारे ग्राहक संपर्क करणार्या एजन्सीज बरोबर आऊट सोर्सिंग च्या माध्यमातुन यात लक्ष द्यावे लागेल.आपल्याला त्या दर्जाचा स्टॉफ ही घ्यावा लागेल.ही बदलत्या काळाची गरज आहे,सबल व सक्षम पणे बँकिग चळवळ उंचीवर नेण्यासाठी हे गरजेचे आहे,असे मला वाटते.

लेखक-
श्री.वासुदेव काळेमो.नं.९८२२८३७०२५

# बागझरी येथील दत्त मंदिराचे दर्शन घेऊन धनंजय मुंडे यांनी केला प्रचाराचा शुभारंभ

पट्टीवडगाव सर्कल मधून प्रचारास प्रारंभ; २००२ ची होणार पुनरावृत्ती!

परळी - पट्टीवडगाव जिल्हा परिषद गटातील बागझरी येथील दत्त मंदिरात दर्शन घेऊन आरती करत आज धनंजय मुंडे यांनी परळी विधानसभा मतदारसंघात प्रचाराचा शुभारंभ केला आहे. धनंजय मुंडे यांनी सर्वात पहिल्यांदा लढवलेल्या २००२ च्या जिल्हा परिषद निवडणुकीत सुद्धा प्रचाराचा शुभारंभ त्यांनी बागझरीच्या याच दत्त मंदिरात दर्शन घेऊन केला होता. धनंजय मुंडेंच्या प्रत्येक निवडणुकीची सुरुवात बागझरी येथील दत्त मंदिराच्या दर्शनाने होत असते.

मुंडे कुटुंबाच्या दोन पिढ्या तुमच्या सर्वांची सेवा करण्यात गेल्या. आजही आम्हाला सेवेची संधी मिळते ती तुमच्याच आशीर्वादाने, आपण मतदारसंघात विकासासाठी दिलेला



ज्याला तुम्ही निर्माण केले त्याला कोणी संपवण्याचे आव्हान देत असेल तर त्याला २० नोव्हेंबर रोजी मतातून दाखवून द्या – मुंडेंचे आवाहन

प्रत्यक्ष शब्द पूर्ण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. प्रचंड प्रमाणात विकास निधी खेचून आणला. मात्र देशाचे काही उच्चपदस्थ नेते माझा पराभव करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. परंतु तुम्हीच मला तुमच्या आशीर्वादाने आज पर्यंत इथवर आणले आहे. त्याला तुम्हीच निर्माण केले आज त्यालाच संपवण्याची भाषा केली जात असेल किंबहुना तसे आव्हान दिले जात असेल तर अशा लोकांना २० नोव्हेंबर रोजी मतदानातून तुम्ही दाखवून द्या असे आवाहन यावेळी बागझरी व परिसरातील नागरिकांशी संवाद साधताना धनंजय मुंडे यांनी केले.


मी कधीही जातीपातीचे राजकारण केले नाही ज्या दिवशी जात बघून किंवा जात दाखवून मतदान मागायची माझ्यावर पाळी येईल त्या दिवशी मी राजकारण सोडून देईल. कोरोना काळात केलेली मदत आठवा त्यावेळी सुद्धा आपण सर्वांना सोबत घेऊन आपल्याकडून जी शक्य ती सर्व मदत केली. तेव्हा आता तुम्ही स्वतः उमेदवार आहेत असे समजून तुम्ही कामाला लागा असेही पुढे बोलताना धनंजय मुंडे म्हणाले. यावेळी विश्वंभर फड, गणेश कराड, बबन मुंडे, लिंबराज लहाने,विनोद लहान, प्रशांत दहिफळे, माने सर, धनंजय सोळंके यांसह आदी उपस्थित होते.

# गेवराई मतदार संघाचे विद्यमान आ लक्ष्मण पवार तुतारी हातात घेणार ?

## गेवराई ची जागा तुतारी लाच सुटण्याची शक्यता

सुमेध करडे तलवाडा

गेवराई तालुक्याचे भाजपाचे विद्यमान आ लक्ष्मण पवार हे आज ? मुंबईत राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटात दाखल होण्याची संकेत आहेत तसेच असे झाल्यास हा राज्याचे उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांना मोठा धक्का मानला जाईल. याबाबद सविस्तर माहिती अशी की,गेल्या अनेक दिवसापासुन गेवराई मतदार संघाचे विद्यमान आ लक्ष्मण पवार हे पक्षश्रेष्ठीवर नाराज असल्याच्या चर्चा होत्या तसेच पालकमंत्री धनजंय मुंडे यांच्या कार्यपद्धतीवर ते नाराज असल्याचे त्यांनी सांगितले होते तसेच पुढे काय ?निर्णय घेतील हे चित्र अद्याप पर्यंत स्पष्ट नव्हते परंतू आज ( दि १९ ऑक्टोंबर ) रोजी ?ते खा शरदचंद्र पवार यांच्या उपस्थितीत मुंबईत प्रवेश ?करणार असल्याची माहिती



असून ही सगळी प्रक्रीया राज्याचे माजी आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी राबवली असल्याची माहिती आहे असे घडल्यास हा उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांना मोठा धक्का मानला जाईल.तसेच या मतदार संघात नविन समिकरण पहावयास मिळेल.

सध्या तालुक्यात जागा सुटण्याच्या अगोदरच माजी मंत्री बदामराव पंडित तसेच गेल्या विधानसभेला अवघ्या सहा हजार मताने पराभव झालेले जिल्हा परिषदचे माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित शिवसेना ठाकरे गट तसेच राष्ट्रवादीचे अजित पवार गट यांचे कार्यकर्ते जागा सुटण्या अगोदरच कामाला लागले असून सोशल मीडिया तसेच मतदाराच्या गाठीभेटी घेण्यास जोर धरत असून सकाळपासूनच विद्यमान आमदार लक्ष्मण पवार हे शरद पवारांच्या गटात जाणार असल्याची खात्रीशीर चर्चा ऐकावयास मिळत असून गेवराईच्या विधानसभेच्या निवडणुकीत रंगत आली असून ही जागा आमदार लक्ष्मण पवार यांचे कार्यकर्ते अण्णाच तुतारी कोण उभे राहणार असल्याचे सोशल मीडियावर व्हायरल होत असून जर ही जागा लक्ष्मण पवार यांना दिल्यास माजी मंत्री बदामराव पंडित काय निर्णय घेतील की अपक्ष निवडणूक लढवणार? त्यामुळे पूर्ण जिल्ह्याचे लक्ष गेवराई मतदार संघावर लागून राहिले आहे

# तलवाडा स.पो.नी नरकेच्या आशीर्वादाने दारूची गंगा वाहू लागली?

- दारूचे रोज दुकान तयार होऊ लागली
- बीट अंमलदार काकडे अर्थपूर्ण दुर्लक्ष.
- खाना होळीच्या नावाने रोज विक्री होते लाखो रुपयाची दारू.
- एस पी साहेबाकडून कारवाई करण्याची मागणी

तलवाडा (प्रतिनिधी)

गेवराई तालुक्यातील तलवाडा या ठिकाणी खुलेआम राज रोज पणे देशी विदेशी दारूची विक्री होत असून काही लोकांनी शकल लढवून पोलिसाची हाताशी धरून खुलेआम रस्त्यावरती खानावळ बोर्ड तयार करून आत मध्ये देशी विदेशी दारू बेकायदेशीर विकत असून अशा धंद्यावाल्याची चांदी होत असून रोज लाखो रुपयाची उलाढाल होताना दिसून येत आहे सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ नरके हे आल्यापासून अशा धंद्यावाल्यात वाढ होत असताना दिसून येत असून याकडे पोलीस अधीक्षक साहेबांनी सिंघम पोलीस निरीक्षक देऊन अशा धंद्यावाल्यावर कारवाई करण्याची मागणी होताना दिसून येत आहे

याबाबत सविस्तर माहिती अशी की, गेवराई तालुक्यातील तलवाडा हे गाव सर्वात मोठे गाव म्हणून ओळखले जाते या गावाशी आजूबाजूच्या खेड्यापाड्याची रोज संपर्क होत असून तालुक्यागत सुख सुविधा मिळत आहे त्यामुळे लाखो रुपयाची उलाढाल होत असते काही लोकांनी याचाच फायदा घेत बीट अंमलदाराशी जवळीक करून मिल बाठ के खायेंगे या मनी प्रमाणे वरून खानावळीचे नाव



टाकून आत मधी बिनधास्त खुल्या देशी विदेशी दारू आवच्या सव्वा भावात विकून रोज कसलाही परवाना नसताना बिनधास्त लाखो रुपये पोलिसांच्या आशीर्वादाने कमावत असून अशी दुकाने गेवराई तलवाडा रस्त्यावर सजावट करून सुरू असून तर एवढेच नाही तर तलवाडा राहिरी रस्त्यावर देखील ही दुकाने थाटली असून तर पोलीस स्टेशनच्या हाकेच्या अंतरावर बिनधास्तपणे चालत असून तर बियर शॉपी च्या नावाने देशी विदेशी दारू बीट अंमलदार चे आशीर्वादाने चालवली जात आहेत त्यामुळे अनेकांची संसार उघड्यावर येत असून सुशिक्षित बेरोजगार युवक अशा दुकानावर दिसत असून पोटच्या मुलांना एक रुपया न देता अशा दुकानात पैशाची उधळपट्टी करत असून एखाद्या सिंघम अधिकाऱ्याची गरज असताना दिसून येत आहे

जेव्हापासून सोमनाथ नरके यांनी चार्ज घेतल्यापासून अशा धंद्यावाल्यात वाढ होताना दिसून येत असून एखादा नवीन व्यक्ती गावात आला तर बिहारमध्ये आल्यासारखं वाटत असून कायदा मात्र वेशीला टांगला असल्याचे सर्वसामान्यातून बोलले जात आहे नूतन पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांच्याकडून तलवाडा करांना मोठ्या अपेक्षा असून अशा धंद्यावाल्यावर बेधडक कारवाई करून एखादा सिंघम पोलीस निरीक्षक नेमण्यात यावा अशी मागणी तलवाडा तसेच परिसरातून होत आहे



## युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष अलीम शेख यांसह असंख्य तरुणांचा धनंजय मुंडे यांच्या उपस्थितीत

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश

परळी - परळी शहर युवक काँग्रेसचे अध्यक्ष अलीम शेख तरुणांचा मंत्री धनंजय मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जाहीर प्रवेश झाला. यावेळी धनंजय मुंडे यांनी सर्वांचे पक्षात स्वागत करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी काँग्रेसचे युवक आघाडीचे शहराध्यक्ष अलीम शेख, यांच्यासह शेख रफिक, शेख मोहसीन, शेख मुनीब, इस्माईल, अमन, सिराज सय्यद, सुलतान, आदिल भाई, अदनान , इरफान, लतीफ, रावसाहेब गोरे, नानाजी, फिरदोस रेहान, आसिफ नूर, मुश्ताक, रेहान, इम्तियाज, फरहान, आसिफ, मेहराज अशा अनेक तरुणांनी यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. यावेळी ज्येष्ठ नेते वाल्मीकांना कराड यांचीही उपस्थिती होती.

# प्रकाश सोळंकेला मातंगाचा प्रचंड विटाळ


## सोळंके तुम्ही चार वेळेस आमदार राहिला पण अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकाचा प्रश्न का सोडविला नाही ?

माजलगांव । सुनिल थोरात

राज्यात विधानसभा निवडणुकांचे बिगुल वाजले असून माजलगाव मध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकाचा प्रश्न आमदार सोळंके यांना व त्यांच्या पुतण्या यांना चांगलाच महागात पडणार आहे कारण या प्रश्नाला घेऊन मातंग समाजामध्ये प्रचंड रोष निर्माण झाला आहे. माजलगाव मतदार संघात चार टर्म आमदार राहिलेले प्रकाश सोळंके यांच्या विरोधात स्मारकाच्या मुद्द्यावरून मातंग समाज बांधवांकडून रोज निर्माण झाल्यामुळे याचा फटका पुतण्या जयसिंग सोळंकेला बसणार आहे कारण सोळंके ला मातंग समाजाचे नेते चालतात मातंग समाजाचे मत चालते पण समाजाची अस्मिता लोकशाहीर आण्णाभाऊ साठे चालत नाहीत अशा प्रतिक्रिया मातंग समाजातून उमटताना दिसत आहेत प्रकाश सोळंके तुम्ही चार वेळेस आमदार झालात पण कधी अण्णाभाऊ साठे स्मारकाचा प्रश्न सोडविला नाही अजून तसाच आहे यावरून हेच सिद्ध होते की तुम्हाला मातंग समाजाचा प्रचंड विटाळ आहे तुम्हाला मातंग समाजाचा काहीच घेणं देणं नाही तुम्ही फक्त मतापुरताच वापर करून घेता पण यावेळेस मातंग समाज तुम्हाला व तुमच्या पुतण्याला चांगलाच धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही. मातंग समाजाने प्रकाश सोळंके ला भरभरून मत दिले पण सोळंकेला या समाजाचा विसर पडला त्यांनी फक्त मतापुरताच या समाजाचा वापर करून घेतला.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाचा मार्ग मोकळा

नुकतच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकासाठी बस स्थानकाची जागा देण्यात येत आहे असे पत्र दिले आहे. त्यामुळे या



दोन्ही स्मारकांचा मार्ग मोकळा झालेला आहे लवकरच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक येथील बस स्थानक व शिवाजी महाराज चौक येथील बस स्थानक येथे या दोन्ही महापुरुषांचे स्मारक उभे राहतील.तुम्ही या दोन्ही महापुरुषांचे स्मारक उभे करताय आम्हाला त्याचा खूप अभिमान आहे पण आमच्या समाजाची अस्मिता लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकाचं काय सोळंके तुम्ही उत्तर द्या?*सोळंके मातंग समाजाचा एकही पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्य, नगरसेवक, नाही एवढी कशामुळे मातंग समाजाची चीड तुमच्यामध्ये आहे याचे उत्तर द्या?*माजलगाव धारूर वडवणी प्रत्येक तालुक्यात मातंग समाजासाठी समाज मंदिर व दोन दोन एकर जागा मागितली होती ती पण दिली नाही. माजलगाव शहरातील अण्णाभाऊ साठे मुख्य चौक माजलगाव विधानसभा क्षेत्रातील १८००० मातंगाच्या अस्मितेचा मुद्दा हा गेल्या २६ वर्षापासून पेंडिंग आहे. त्या चौकातील डी टी पी सी चा साधा पोल सध्या काढू शकले नाही आणि पाच वर्षांमध्ये सामाजिक न्याय विभाग किंवा आमदार फंड किंवा डीटीपीसी या तीनही फंडातून किंवा इतर फंडातून पाच वर्षात माजलगाव मतदार संघात ३० कोटी रुपयाचे समाज मंदिर अपेक्षित होते परंतु आमदार सोळंकेने एकही मातंग समाजाला समाज मंदिर दिले नाही उलट दलित वस्त्यावरचे मातंग वस्त्यावरचे बोगस कामे करून बोगस बिल काढून कामे करण्यात आले कारण हा समाज आवाज उठवत नाही. मातंग समाजासाठी प्रकाश सोळंकेने काय केले याचे उत्तर द्यावे

– मा.भास्कर शिंदे, संस्थापक लहुजी विद्रोही सेना

# जोडप्यांचे सुरु होते आंबट चाळे

## पोलिसांचा छापा कॉफी शॉप मालकावर गुन्हा दाखल

बीड (प्रतिनिधी)

शिवाजीनगर पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, कॅनॉल रोड येथील स्टार बर्ड्स कॅफचे चालक/मालक यांनी स्टार बर्ड कॅफेच्या ठिकाणी मुलामुलींना बसण्यासाठी व अश्लिल चाळे व बेशिस्त वर्तन करण्यासाठी जागा उपलब्ध करुन दिली आहे. सदर ठिकाणी पोलीसांनी छापा टाकला असता, सदर कॅफेचा चालक/मालक नामे राहुल मसुनाथ गावडे वय २३ वर्षे, ह.मु. राधाकृष्ण नगरी, बीड रा. नवगण राजुरी ता. जि.बीड हा काउंटरवर मिळून आला. व सदर कॅफेची पोउपनि शिंगणे यांनी आत जावून पाहणी केली असता, आतमध्ये १० बाय १० बाय रुंदीचे कंपार्टमेंट प्लायवुड ने वेगवेगळे करुन त्यामध्ये खुर्ची व टेबल ठेवलेले दिसून आले. सदर कंपार्टमेंट मध्ये मंद उजेड करण्यात आलेला होता. त्यात काही जोडपी अश्लिल चाळे करताना दिसले. तेव्हा त्यांना नाव पत्ता विचारुन त्यांचे ओळखपत्राची खात्री करुन त्यांना योग्य ती समज

देवुन सोडुन देण्यात आले आहे. सदरकॉफी शॉपची पाहणी केली असता कॉफी शॉपच्या रुममध्ये १० बाय १० लांबी रुंदीचे प्लायवुडचे ०३ कप्पे असून त्यास बाहेरचे बाजुने वन वे ग्लास एका बाजुने दिसणाऱ्या काळ्या काचेचे दरवाजे बसविलेले दिसून आले. कॉफी शॉप मध्ये दर्शनी भागात कॉफी शॉपचा कुठलाही परवाना दिसुन आला नाही. तसेच कॉफी शॉप चालकाने आलेल्या मुलांमुलीचे कसल्याची प्रकारचे रेकॉर्ड ठेवल्याचे दिसुन आले नाही. सदर ठिकाणी म लामुलींना बसण्यासाठी खुर्चा व टेबल ठेवुन मंद उजेडात अश्लिल चाळे व बेशिस्त वर्तन करण्यासाठी जागा उपलब्ध करुन दिल्याने कॉपी शॉप मालक राहुल मसुनाथ गावडे याचे विरुध्द महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १२९. १३१ अन्वये गुन्हा नोंद करुन पुढील तपास पोउपनि श्री. निमोणे करत आहे. शिवाजीनगर पोलीस ठाणे मार्फत यापुढेही यासारखे विनापरवाना व बेकायदेशीर कॉफी शॉप चालवणाऱ्या कॉफी शॉप वर कारवाई करण्यात येणार आहे. सदरची कारवाई

# राष्ट्रीय गोरक्षा मंच साठी विधानसभेच्या दोन जागा द्या: लव्हाळे


टाकरवन/ प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने सर्वच राजकीय पक्ष कामाला लागले असून जागा निश्चिती धोरण आखले जात आहे या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रीय गोरक्षा मंच साठी दोन विधानसभेच्या जागा द्या अशी मागणी गोरक्षा मंचाचे राष्ट्रीय अध्यक्ष मुरली लव्हाळे यांनी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना.देवेद्र फडणवीस साहेब यांच्या कडे केली असल्याची माहिती त्यांनी दिली.

राष्ट्रीय गोरक्षा मंच मराठवाड्यातील दोन जागा लढवू इच्छित आहे. शासनाने या पूर्वीच गाई ला राज्य गोमातेचा दर्जा दिला आहे त्या अनुषंगाने गोमातेचे संवर्धन आणि प्रसारासाठी अधिक उत्तम रीतीने होण्यासाठी विधानसभेत प्रतिनिधी का असू नये..? असा प्रश्न उपस्थित होत आहे. राष्ट्रीय गोरक्षा मंच उत्तर प्रदेश चे मुख्यमंत्री



योगी अदित्यनाथजी व साध्वी सरस्वतीजी मिश्रा यांच्या मार्गदर्शनाखाली वाटचाल करीत आहे. देशात व राज्यात आदर्श गोमाता पशुपालक आहेत , त्यांना स्वतंत्र मार्गदर्शन व्हावे अधिक गतिमान पध्दतीने प्रसार व्हावा यासाठी विधानसभेत प्रतिनिधीत्व असावे त्या साठी आम्ही , मराठवाड्यातील विधानसभेच्या दोन जागा देण्याची मागणी करत असल्याची माहिती श्री लव्हाळे यांनी दिली.उपमुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणीस साहेब याना भेटून राष्ट्रीय गोरक्ष मंच साठी मराठवाड्यातील दोन जागा देण्यात याव अशी मागणी करताना गोरक्षा मंच चे अध्यक्ष मुरली लव्हाळे



तीर्थक्षेत्र विज्ञानेश्वर आपेगाव तालुका अंबड या ठिकाणी दैनिक महाराष्ट्र आरंभ पत्रकार सुमेध करडे यांनी भेट दिली असता त्यांचा सत्कार करताना ट्रस्टचे अध्यक्ष मुरली अण्णा चौधरी तसेच पदाधिकारी व सोबत रवी अण्णा रायते.

# विजयसिंह पंडित यांना आमदार करण्यासाठी युवकांची फौज उभी करणार - सलिम शेख

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गेवराई तालुक्यात सर्व पक्षाचे नेते ,नेते तयारीला लागले आहेत.गावोगावी जाऊन मतदारांसोबत बैठकां घेऊन संवाद साधत आहेत. मात्र कोणी कितीही ताकत दाखवली तरी गेवराई तालुक्यात आमदार म्हणून विजयसिंह पंडित यांनाच निवडून आणायचे आहे यासाठी कार्यकर्ते तयारीला लागले आहेत. जीवाचं रान करू रात्रीचा दिवस करू तरुणांना एकत्र करत मोठी ताकद उभी करून यावेळेस विजयराजेंना आमदार करू असा निर्धार रायकाँ चे जिल्हा उपाध्यक्ष सलिम शेख यांनी केला आहे. गेवराई मतदारसंघात सर्वसामान्य जनतेच्या हक्कासाठी लढणारे, कार्यकर्त्यांच्या जीवाला जीव देणारे सगळ्यांना सोबत घेऊन चालणारे,

सदैव सर्वसामन्यांच्या सुखा दुःखात सावली प्रमाणे सोबत असणारे युवकांच्या हक्काचे नेते म्हणून विजयसिंह पंडित यांची ओळख आहे. मागच्या विधानसभा निवडणुकीत निसटता पराभव झाला, तरीही खचून न जाता त्याच ऊर्जेने विजयसिंह पंडित हे पूर्ण पंचवार्षिक गेवराई तालुक्यातील जनतेच्यापाठी, त्यांच्यासाठी कायम मैदानात उभे होते. त्याचीच पावती म्हणून संपूर्ण युवक एकजुटीने विजयराजेंच्या पाठीशी उभे आहेत, या सर्व युवकांची फौज उभी करत विजयसिंह पंडिताना विजय करण्याचा मोठा निर्धार सलीम शेख यांनी पत्रक काढत जाहीर केले !




# मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी माजी आ. भीमराव धोंडे यांच्या पाठीशी उभे रहा – माजी सरपंच संतोष चव्हाण

आष्टी ।प्रतिनिधी

आष्टी- पाटोदा - शिरूर विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी मतदारांनी विकासाभिमुख नेतृत्व व माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या पाठीशी येत्या निवडणुकीत खंबीरपणे उभे राहावे असे आवाहन आष्टी - मुर्शदपुर- सिदेवाडीचे माजी सरपंच संतोष भैय्या चव्हाण यांनी केले आहे. याबाबत अधिक माहिती देताना माजी सरपंच संतोष चव्हाण यांनी सांगितले की,



आष्टी- पाटोदा - शिरूर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार भीमराव धोंडे यांनी पहिल्या टप्प्यात १५ वर्ष आमदार असताना मतदारसंघात प्रचंड अशी विकास कामे केली आहेत. पाझर तलाव, वाड्या - वस्त्यांना जोडणारे रस्ते तसेच इतर अनेक विकास कामे केली आहेत. तसेच शेतकऱ्यांसाठी आष्टी ते बीड आष्टी ते मुंबई आणि आष्टी ते दिल्ली असे हजारों शेतकऱ्यांना घेऊन मोर्चेही काढले आहेत. त्यानंतर पुन्हा वीस वर्षाच्या गॅप नंतर २०१४ मध्ये माजी आमदार भीमराव धोंडे यांची विधानसभेवर निवड झाली. पुन्हा आमदार झाल्यानंतर तर मतदारसंघात कोट्यावधी रुपयांचा निधी आणून रस्ते विकास केला आहे. त्याचप्रमाणे मतदारसंघात शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून शिक्षणाची गंगा गावोगाव पोहोचली आहे. गावोगावी शाळा महाविद्यालय सुरू केल्याने गोरगरिबांना शिक्षणाची आपापल्या गावातच सोय झाली आहे, तसेच आष्टी सारख्या दुष्काळी भागात आष्टी येथे सर्व प्रकारच्या शिक्षणाची सोय त्यांनी केली आहे. अशा विकासाची दृष्टी असलेल्या माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या पाठीशी मतदारांनी येत्या विधानसभा निवडणुकीत खंबीरपणे उभे रहावे असे आवाहन माजी सरपंच संतोष चव्हाण यांनी केले आहे.

# केज विधानसभा मतदार संघ २३२ (अ.जा) निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज

केज/प्रतिनिधी

केज विधानसभा मतदार संघ २३२ (अ.जा.) निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज झाले असल्याची माहीती उपजिल्हाधिकारी तथा निवडणुक निर्णय अधिकारी दिपक वजाळे यांनी पत्रकारांशी वार्तालाप करताना सांगितले.यावेळीबोलताना त्यांनी सांगितले की,केज विधानसभा मतदार संघात एकुण ३,८५,०८१ एवढे मतदार आहेत त्यापैकी केज तालुक्यात १,१०, ९७० पुरुष तर १,००५१८ स्त्रिया असुन १तृतीयपंथी मतदार आहे.त्यानंतर अंबाजोगाई तालुक्यातील ७२०३० पुरुष ६६६९६ स्त्रिया तर ५ तृतीयपंथी मतदार आहेत.तसेच बीड तालुक्यातील १८६३२ पुरुष तसेच १६२२९ स्त्रिया असे तिन्ही तालुक्यातुन ३,८५,०८१ मतदार




## निवडणूक निर्णय अधिकारी दिपक वजाळे यांची माहीती

आहेत.पोष्टल मतदान एकुण ७२५ आहे. पोष्टल मतदान रोज दुपारी ३ वाजता स्विकारण्यात येणारआहे.आजारीअथवा ८५ वर्षाच्या पुढीलमतदार यांचे घरपोच मतदान घेण्याचीव्यवस्थाकरण्यात येणार आहे.निवडणूक आयोगाच्या निर्णयानुसार एकुण १८ मतदान केंद्र संवेदनशील आहेत तर १० टक्के पेक्षा कमी मतदान झालेले २ मतदान केंद्र आहेत.निवडणूक प्रक्रिया सुरळीत व्हावी यासाठी नेकनुर, कासारी, माळेगाव,वाघाळा असे चारचेक पोष्ट तयार करण्यात येणार आहेत. उमेदवारांना एक खिडकी द्वारे परवाने देण्यात येणार आहेत.उमेदवार खर्चाची मर्यादा ४० लक्ष रुपये असुन उमेदवाराची तीन वाहने अधिकृत आहेत. एका उमेदवारा सोबत पाच लोकांना प्रवेश देण्यात येणार आहे. उमेदवारी अर्ज भरण्या साठी ५,००० रुपये डिपाझीटअसुनअनुसुचीत जात प्रमाणपत्रआवश्यक आहे.यावेळी उप जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी दिपक वजाळे, मुख्य निवडणूक अधिकारी प्रियंकाटोणगे,अंबाजोगाई तहसीलदार विलास तरंगे, केज तहसीलदार राकेश गिड्डे,गटविकास अधिकारी समृद्धी दिवाणे काळे यांची उपस्थीती होती.

# ज्याला तुम्ही निर्माण केले त्याला संपवण्याचे आव्हान

**परळी (प्रतिनिधी)**

**पट्टीवडगाव जिल्हा परिषद गटातील बागझरी येथील दत्त मंदिरात दर्शन घेऊन आरती करत आज धनंजय मुंडे यांनी परळी विधानसभा मतदारसंघात प्रचाराचा शुभारंभ केला आहे. धनंजय मुंडे यांनी सर्वात पहिल्यांदा लढवलेल्या २००२ च्या जिल्हा परिषद निवडणुकीत सुद्धा प्रचाराचा शुभारंभ त्यांनी बागझरीच्या याच दत्त मंदिरात दर्शन घेऊन केला होता. धनंजय मुंडेंच्या प्रत्येक निवडणुकीची सुरुवात बागझरी येथील दत्त मंदिराच्या दर्शनाने होत असते.**

मुंडे कुटुंबाच्या दोन पिढ्या तुमच्या सर्वांची सेवा करण्यात गेल्या. आजही आम्हाला सेवेची संधी मिळते ती तुमच्याच आशीर्वादाने, आपण मतदारसंघात विकासासाठी दिलेला प्रत्यक्ष शब्द पूर्ण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. प्रचंड प्रमाणात विकास निधी खेचून आणला. मात्र देशाचे काही उच्चपदस्थ नेते माझा पराभव करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. परंतु तुम्हीच मला तुमच्या आशीर्वादाने आज पर्यंत इथवर आणले आहे. त्याला तुम्हीच निर्माण केले आज त्यालाच संपवण्याची भाषा केली जात असेल किंबहुना तसे आव्हान दिले जात असेल तर अशा लोकांना २० नोव्हेंबर रोजी मतदानातून तुम्ही दाखवून द्या असे आवाहन यावेळी बागझरी व परिसरातील नागरिकांशी संवाद साधताना धनंजय मुंडे यांनी केले.

मी कधीही जातीपातीचे राजकारण केले नाही ज्या दिवशी जात बघून किंवा जात दाखवून मतदान मागायची माझ्यावर पाळी येईल त्या दिवशी मी राजकारण सोडून देईल. कोरोना काळात केलेली मदत आठवा त्यावेळी सुद्धा आपण सर्वांना सोबत घेऊन आपल्याकडून जी शक्य ती सर्व मदत केली. तेव्हा आता तुम्ही स्वतः उमेदवार आहेत असे समजून तुम्ही कामाला लागा असेही पुढे बोलताना धनंजय मुंडे म्हणाले. यावेळी विश्वंभर फड, गणेश कराड, बबन मुंडे, लिंबराज लहाने,विनोद लहान, प्रशांत दहिफळे, माने सर, धनंजय सोळंके यांसह आदी उपस्थित होते.





बागझरी येथील दत्त मंदिराचे दर्शन घेऊन धनंजय मुंडे यांनी केला प्रचाराचा शुभारंभ
पट्टीवडगाव सर्कल मधून प्रचारास प्रारंभ; २००२ ची होणार पुनरावृत्ती!

# लाडकी बहीण योजनेचे पैसे परस्पर काढून फसवणूक करणाऱ्यावर गुन्हा दाखल करा

## लाडकी बहीणीने जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलीस अधीक्षकांना दिले निवेदन

**प्रतिनिधी** । बीड

मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण योजनेचे पैसे परस्पर अँपद्वारे काढून इरफान बाबू शेख यांने सबियाची फसवणूक केली आहे. सदरील प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशी की, पती,सासू व दिर यांनी संगणमत करून दोन लाख रुपयांसाठी सबियावर जवळ-पास अडीच वर्ष प्रचंड जाच जुलूम केले असून तिचा अनन्वित शारीरिक व मानसिक छळ केला आहे.आणि ती गर्भवती असताना तिला रात्रीच्या वेळी घरात कोंडून तिच्या पोटात,पाठीत व डोक्यात मारले आहे. आणि इरफानने तिच्या हातावर ब्लेड मारून जीवे मारण्याचा प्रयत्न केला असून ती गर्भवती असताना तिच्या पोटावर लोखंडी पाईपने मारहाण केली आहे.सबियाला पती,सासू व दिर यांनी अमानुषपणे मारहाण केल्यामुळे तिचा जिल्हा रुग्णालय,बीड येथे गर्भपात झाला असून, सासरच्या लोकांनी भ्रूण हत्या केली आहे. सासरच्या लोकांवर शिवाजीनगर पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल झाला असून सदरील प्रकरण माननीय न्यायालयात न्याय प्रविष्ट आहे सबियाला पती व सासूने अर्वाच शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी देऊन घराबाहेर हाकलून दिल्यामुळे ती मजबूरीने एक वर्षाच्या लहान मुलासह माहेरी मामा व आजीच्या घरी राहत असून आजी तिचा सांभाळ करीत होती परंतू आजीचे निधन झाल्यामुळे ती दुःखी-कष्टी जीवन जगत असून तिच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न बिकट झाला आहे. सबियाला लाडकी बहीण योजनेमध्ये आशेचा किरण दिसल्यामुळे तिने अर्ज दाखल केला असता तिचा अर्ज मंजूर होऊन मुख्य डाकघर, बीड मधील तिच्या खात्यात पैसे जमा झाले.परंतू ती पैसे काढण्यासाठी गेली असता लाडकी बहीण योजनेचे तीन हजार रुपये परस्पर पद्वारे इरफानने काढले आहे.असे तिला समजले. इरफान हा पैशाचा लालची असून त्याचेवर यापूर्वी दोन लाख रुपयांसाठी सबियाचा छळ केल्यामुळे आणि गर्भपातास कारणीभूत असल्यामुळे गुन्हा दाखल झालेला असताना आणि सदरील प्रकरण माननीय न्यायालयात न्यायप्रविष्ठ असताना सुद्धा जाणीवपूर्वक इरफानने लाडकी बहीण योजनेचे शासनाने दिलेले पैसे परस्पर प द्वारे काढून सबियाची फसवणूक केली आहे. तरी इरफान बाबू शेख रा. चाऊस गल्ली, बालेपिर बीड याचेवर तात्काळ गुन्हा दाखल करावा अशी विनंती सबियाने माननीय जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षक यांना केली आहे.

# विडा येथे अज्ञात वाहनाच्या धडकेने खोकडाचे पिल्लू ठार

**प्रतिनिधी** । केज

विडा - देवगाव रस्त्यावर अज्ञात वाहनाच्या धडकेने खोकडाचे पिल्लू ठार झाल्याची घटना गुरुवारी सकाळी घडली. वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी मृत पिल्लू ताब्यात घेऊन दफन केले.विडा - देवगाव रस्त्यावरील इप्परवस्तीकडे जाणाऱ्या रस्त्याजवळ अज्ञात वाहनाने धडक दिल्याने खोकडाचे अंदाजे सात महिन्याचे पिल्लू ठार झाल्याचे गुरुवारी सकाळी ९.३० वाजता निदर्शनास आले. त्यानंतर विनोद ढोबळे यांनी वन विभागास माहिती देताच वनरक्षक नवनाथ पाईक व वनमजुर वचिष्ट भालेराव यांनी घटनास्थळी धाव घेतली. खोकडाचे मृत पिल्लू ताब्यात घेऊन विडा येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात आणले. पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. माया वाकळे यांनी शवविच्छेदन केल्यानंतर वनरक्षक नवनाथ पाईक व वनमजुर वचिष्ट भालेराव यांनी विडा शिवारात वन विभागाच्या जमिनीत मृत पिल्लू दफन केले.



**प्रतिनिधी** । माजलगांव

माजलगाव येथे ऑल इंडिया पयामे इन्सानियत फोरम माजलगाव येथे मोफत नशा मुक्ती अभियान शरीरात २३० रुग्णांना मोफत औषधी उपचार करून सामाजिक उपक्रम राबविण्यात आले माजलगाव येथील जुना बाजार रोड जुनी नगरपालिका येथे सकाळी ११ ते दुपारी चार वाजेपर्यंत नशा मुक्ती अभियान शिबिरात माजलगावकरांनी उत्कृष्ट प्रतिसाद दिला ह्यावेळी शिबिरा २३० रुग्णांची मोफत आरोग्य तपासणी मार्गदर्शन व मोफत औषधी उपचार करण्यात आले ह्या शिबिरात बीड शहरातील मनोपउपचार तज्ञ डॉक्टर मोमीन मुजाहेद डॉक्टर स्वामी साहेब व त्यांची टीम उपस्थित होती तसेच या कार्यक्रमात माजलगाव शहर पोलीस निरीक्षक राहुल सूर्य तळ साहेब यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले नशा मुक्ती अभियान शिबिरात सर्व प्रकारच्या व्यसनावर मार्गदर्शन करून मोफत तपासणी औषधी उपचार करण्यात आले

# मतदार यादीत नाव नोंदवा आणि मतदानाचा हक्क बजवा

## विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांचे आवाहन

बीड /प्रतिनिधी

विधानसभेची निवडणूक २० नोव्हेंबरला होत आहे. या निवडणुकीत मतदान करता यावे यासाठी मतदार यादीत नाव नोंदविण्यासाठी शनिवार,१९ ऑक्टोबर पर्यंत मतदार यादीत नाव नोंदविता येणार आहे, तरी छत्रपती संभाजीनगर विभागातील सर्व पात्र मतदारांनी आपली नावे नोंदवून आपला मतदानाचा हक्क बजवावा,असे आवाहन विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी मतदारांना केले आहे. विधानसभा निवडणूक २०२४ करीता मतदान करण्यासाठी आपण पात्र असाल मात्र आपले नाव मतदार यादीत नसेल तर अजूनही वेळ गेलेली नाही. शनिवार, १९ ऑक्टोबर ही मतदार यादीत नाव नोंदविण्यासाठी शेवटची तारीख आहे. १९ ऑक्टोबर पर्यंत आपण मतदार होऊ शकता. यासाठी व्होटर हेल्पलाइन हे मोबाईल प, ु.ींशिी.शलळ.सीं.ळप या वेबसाइटवर सुद्धा ऑनलाइन पद्धतीने मतदार नोंदणीचा फॉर्म नमुना ६ भरु शकता किंवा मतदान नोंदणी अधिकारी कार्यालयात जाऊन मतदार होऊ शकता. यासंदर्भात १८००-२२-१९५० या हेल्पलाइनचीही मदत घेऊ शकता.

मतदार यादी अंतिम करण्याची प्रक्रिया ही नामनिर्देशन प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सुरू असते.

# आंतरभारतीच्या वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यांचा सेलूमध्ये गौरव

## नूतन कन्या प्रशालेच्या विद्यार्थिनी ठरल्या विजेत्या

सेलू ( प्रतिनिधी )

आंतरभारतीच्या वतीने महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त महात्मा गांधी राष्ट्रीय व्हिडिओ वक्तृत्व स्पर्धा अंतर्गत परभणी जिल्हास्तरीय स्पर्धेतील विजेत्यांचा बुधवारी, १६ ऑक्टोबर रोजी करण्यात आला. या स्पर्धेत सेलू येथील नूतन कन्या प्रशालेच्या विद्यार्थिनींनी घवघवीत यश संपादन केले आहे.सेलू (जि.परभणी) येथील आंतरभारती शाखेच्या वतीने परभणी जिल्हास्तरावर या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. बक्षीस वितरण प्रसंगी आंतरभारती सेलूचे अध्यक्ष महादेव आगजाळ, स्वामी रामानंद तीर्थ



हिंदी मराठी ग्रंथालयाचे सहसचिव तथा गझलकार संजय विटेकर, बाबासाहेब हेलसकर, सर्जेराव लहाने, विलास शिंदे, पंडित जगाडे, संयोजक कल्पना दत्तात्रय हेलसकर, सचिव कीर्ती राऊत यांची उपस्थिती होती. या वेळी प्रथम क्रमांकप्राप्त समीक्षा दिनकर कुलकर्णी, द्वितीय अक्षरा गजानन पवार, तृतीय लावण्या दीपक शेरे (नूतन कन्या प्रशाला सेलू) तसेच तृतीय शिवानी कळसाईतकर (जिपप्राशा, राणी वाहेगाव) या विजेत्यांचा प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी मार्गदर्शन करतांना संजय विटेकर म्हणाले की; विद्यार्थ्यांनी आपल्यातील सुप्त कलागुणांना आणि व्यक्तिमत्वाला विकसित करण्यासाठी विविध प्रकाराच्या स्पर्धेत सातत्याने व्हावे. प्रारंभी महात्मा गांधी आणि साने गुरूजी यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. सूत्रसंचालन कीर्ती राऊत यांनी केले. कल्पना हेलसकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाला वाचक, विद्यार्थी, पालक, शिक्षक यांची उपस्थिती होती.

# द लास्ट ट्रूथ फाउंडेशन कडून संगणकाचे मोफत वाटप

माजलगाव (प्रतिनिधी)

दिव्यांग व्यक्तीना स्वतःच्या, सामाजिक व आर्थिक विकासासाठी सामान्य लोकांप्रमाणे संधी मिळत नाही. विविध शासकीय योजना ज्याला गरज आहे अश्या दिव्यांगा पर्यंत पाहोचत नाहीत, त्यामुळे अनेक दिव्यांगांना स्वयंरोजगार करण्याची इच्छा असते परंतु त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे ते शक्य होत नाही. अपंगत्व हा आपल्या जीवनातील सर्वात मोठा अडसर असल्याचे त्यांना वाटते. त्यामुळे ते नैराश्यात जीवन जगत असतात व मिळेल ते काम करून आपला उदरनिर्वाह करतात.

द लास्ट ट्रूथ फाउंडेशन चे संस्थापक ऋषीकेश अशोकराव टाकणखार यांनी माजलगाव तालुक्यातील संगणकाचे ज्ञान असलेले, गरजू व होतकरू तरुण-तरुणींचा शोध घेऊन त्यांच्या उपजीविकेचे साधन म्हणून स्वयंरोजगारासाठी डी इ एफ संस्थेच्या अभिषेक सर यांच्या मदतीने मोफत तीन संगणक व दोन झेरॉक्स मशीन हाफत्यावर मिळून दिल्या.

माजलगाव तालुक्यातील टाकरवन येथील रामदास कदम, सांडस चिंचोली येथील मीरा गिरी व किट्टी आडगाव येथील ऊसतोड मजूर असलेले रामेश्वर वावळकर यांना तीन संगणक व दोन झेरॉक्स मशीन देऊन तीन ऑनलाइन सर्व्हिसेस सेंटर च्या माध्यमातून स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यास मदत केली.

या सामाजिक कार्यात माजलगाव तालुका व्यापारी महासंघाचे तालुका अध्यक्ष चे मालक सुरेंद्र रेदासनी, बालाजी सुपरमार्केट चे मालक कपिल पगारिया तसेच सुपर कॉम्पुटर चे संचालक




देविदास दराडे, अमोल धारक तसेच भारत टाकणखारसर, नितीन काळे यांनी मोलाचे सहकार्य केले.

द लास्ट ट्रूथ फाउंडेशनने राबवलेल्या या सामाजिक उपक्रमाचे संपूर्ण जिल्हाभरामध्ये कौतुक होत आहे. आपल्या कोणाकडे चालू स्थितीतील असलेले व वापरात नसलेले संगणक किंवा लॅपटॉप असतील तर संस्थेला दान करावेत जेणेकरून आणखी दिव्यांग व्यक्तींना मदत करता येईल असे आवाहन संस्थेचे सहसचिव प्रा. रमेश टाकणखार सर यांनी केले. संस्थेचे जिल्हा समन्वयक मानव पोटभरे, चेतन निसर्गंध, प्रतिज्ञा तुपारे, अमोल पुंडगे व राहुल दिडवाले यांनी सेंटर स्थापनेत सर्वांना मोलाचे सहकार्य केले.

# शरद पवारांनी राज्याला विकासापासून दूर ठेवले-उदयनराजे

सातारा (प्रतिनिधी)

जी कामे भाजप महायुतीच्या कालावधीत झाली, ती शरद पवारांच्या प्रदीर्घ राजकीय कालावधीत का होऊ शकली नाहीत, याचा विचार जनतेने करायला हवा. पवारांनी आजवर केवळ राजकारण केले. राज्याला विकासापासून कायम दूर ठेवत स्वत:च्या राजकीय फायद्यासाठी राज्यात जाती-जातींमध्ये भांडण लावण्याचे ठोस काम पवारांनी केल्याचा आरोप खासदार उदयनराजे भोसले यांनी येथे बोलताना केला. अनेक वर्षे केंद्र आणि राज्यातील सत्ता असताना, चार वेळा मुख्यमंत्री असतानाही पवारांच्या कार्यकाळात राज्य मागे पडले. अन्य छोटी छोटी राज्ये महाराष्ट्राच्या पुढे गेली. याला सर्वस्वी पवार जबाबदार असल्याची टीकाही उदयनराजे यांनी यावेळी केली.

आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या प्रमुख कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात खासदार उदयनराजे भोसले बोलत होते. या वेळी आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले, महाराष्ट्राचे सहप्रभारी अजय जयवाल, रघुनाथ कुलकर्णी, सुनील काटकर, भरत पाटील, वसंतराव मानकुमरे, सुवर्णाताई पाटील, सौरभ शिंदे, ज्ञानदेव रांजणे, संतोष कणसे, रंजना रावत, निशांत पाटील, अशोकराव मोने, गीतांजली कदम, विकास गोसावी, डॉ. अच्युतराव गोडबोले, शंकरराव माळवदे, महेश गाडे, विठ्ठल बलशेठवार आदी सातारा-जावळीतील प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.



शरद पवार यांनी राज्यात कृष्णा खोरे, दुष्काळी जलसिंचन, औद्योगिकीकरण, पाणी प्रश्न, रस्तेविकासापासून महाराष्ट्राला वंचित ठेवले. ते चार वेळा मुख्यमंत्री होते. त्या वेळी केंद्र आणि राज्यामध्ये एकच सत्ता होती. मात्र, त्यांनी राज्यासाठी कोणतेही मोठे विकासाचे काम केले नाही, असे सांगत उदयनराजे भोसले म्हणाले, की त्यांनी केवळ स्वत:च्या राजकीय फायद्यासाठी राज्यात जाती-जातींमध्ये भांडण लावण्याचे ठोस काम केले. राज्यात दुजाभाव निर्माण करण्याचे काम केले. छत्रपती शिवाजी महाराजांचा सर्वधर्मसमभावाचा विचार त्यांनी पायदळी तुडवला. शाहू-फुले-आंबेडकरांचे नाव घ्यायचे आणि सतत समाजाला फसविण्याचे काम पवार आजवर करत आले आहेत. सत्ता आणि सत्तेच्या माध्यमातून स्वत:ला आणि स्वत:ची हुजरेगिरी करणाऱ्या कार्यकर्त्यांना मोठे केले, असा आरोपही उदयनराजे यांनी केला.

दुसऱ्या बाजुला भारतीय जनता पक्षाने आणि महायुतीने सर्व समाजाला एकसंध आणि सर्व समाजाचे कल्याण करण्याचे काम केले. युवकांपासून वृद्धांपर्यंत आणि महिलांसाठी अनेक योजना त्यांनी सुरू केल्या. शरद पवारांनी फक्त निवडणुकीपुरता छत्रपती शिवाजी महाराजांचा विचार जनतेसमोर मांडला. समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचे काम केले. याबाबत त्यांनी आत्मपरीक्षण करावे. आज देशातील अन्य छोट्या राज्यातून आलेले नेत्यांनी त्यांची राज्ये विकसित केली, ते नेते वरिष्ठ पदावर गेले. पण हे पवार करू शकले नाहीत. आपल्याकडून हे का घडू शकले नाही, याचा विचार त्यांनी करावा. त्यांनी समाजाची दिशाभूल करू नये. निवडणूक येतील जातील पण समाजात हे विष कालवण्याचे काम केले त्याबद्दल त्यांना भविष्य माफ करणार नाही असा घणाघाती आरोप उदयनराजेंनी या वेळी केला. या वेळी शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे भाषण झाले.

# राज्यातील शाळांच्या सुट्या कमी होणार? काय आहे कारण?

पुणे (प्रतिनिधी)

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार तयार केलेल्या राज्य अभ्यासक्रम आराखड्यानुसार वर्षभरातील राष्ट्रीय-राज्य सुट्या, सत्र सुटी, अन्य सुट्या विचारात घेतल्यानंतर २३४ दिवस कामकाज अपेक्षित आहे. त्यामुळे शाळांचा एकूण कामकाजाचा वेळ वाढणार असून, हे कामकाज पूर्ण करण्यासाठी सुट्या कमी कराव्या लागण्याची शक्यता आहे. त्याबाबतचे संकेत राज्य अभ्यासक्रम आराखड्यात देण्यात आले आहेत.




राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषदेने तयार केलेल्या अभ्यासक्रम आराखड्याला सुकाणू समितीने मान्यता दिली आहे. त्यात राज्य मंडळाच्या शाळांसाठीही केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाचे (सीबीएसई) वार्षिक वेळापत्रक लागू करण्याची तरतूद करण्यात आली आहे. सीबीएसईशी संलग्न शाळांचे नवीन वर्ष १ एप्रिल रोजी सुरू होऊन ३१ मार्च रोजी परीक्षेचा निकाल जाहीर करून संपते. या शाळांना मेमध्ये उन्हाळी सुटी आणि सत्र संपल्यावर किंवा राष्ट्रीय सण-समारंभाच्या अनुषंगाने काही दिवसांच्या दीर्घ सुट्या दिल्या जातात. मे महिन्यातील सुटीनंतर शाळा १ जून रोजी पुन्हा अध्यापन कार्य सुरू करतात. सीबीएसई संलग्न शाळा भारतभर आणि भारताबाहेरही सुरू आहेत. याचा अर्थ उत्तर भारतातील अति थंड किंवा अति उष्ण असे विषम वातावरण असणाऱ्या क्षेत्रांमध्ये, अतिवृष्टीप्रवण क्षेत्रातील सर्व शाळांसाठी वार्षिक वेळापत्रक समान असल्याचे दिसून येते, असे नमूद करण्यात आले आहे.

सद्य:स्थितीत राज्यातील पूर्ण वेळ शाळा सहा ते साडेसहा तास भरतात, तर अध्यापनासाठी चार ते साडेचार तास असतात. इमारत अपुरी असल्यामुळे किंवा विद्यार्थिसंख्या जास्त असल्यामुळे अनेक शाळा दोन सत्रांत चालवाव्या लागतात. या शाळांना उपलब्ध होणाऱ्या वेळेचा विचार करावा लागणार आहे. अशा दोन सत्रांतील शाळांना दिवसाला जास्तीत जास्त साडेपाच तास उपलब्ध असतात. त्यात अध्यापनासाठी साडेचार तास मिळतात. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यानुसार दैनंदिन पाच ते साडेसहा तास अध्यापन होणे आवश्यक केले आहे. त्यात तिसरी ते पाचवीसाठी घड्याळी एक हजार तास, सहावी ते दहावीसाठी घड्याळी १२०० तास शैक्षणिक कामकाज होण्याची अपेक्षा आहे. मात्र, त्याची पूर्तता सर्व शाळांमध्ये होणे कठीण आहे. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यानुसार शाळांना आवश्यक कामकाज कालावधी, राष्ट्रीय श्रेयांक आराखड्यानुसार निश्चित केलेली श्रेयांक पातळी पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांना पुरेसा अध्ययन कालावधी उपलब्ध करून देणे आवश्यक असेल. दैनंदिन कामकाजासाठी वेळ कमी मिळत असल्याने शाळा जास्त दिवस सुरू ठेवून तो कालावधी वर्षभरात भरून काढता येईल. वर्षभरात अभ्यासक्रमाचा कार्यभार प्रभावीपणे पूर्ण करण्यासाठी वार्षिक वेळापत्रक लागू करणे आवश्यक आहे, असे नमूद करण्यात आले आहे.

### सीबीएसई शाळांतील गुणवत्तेचे तर्कट

'सीबीएसईच्या शाळांमध्ये खूप दीर्घ सुट्या न देता अध्ययन-अध्यापन प्रक्रिया, उपक्रम शाळेतच सुरू ठेवले जातात. त्यामुळे सीबीएसई संलग्न शाळांमध्ये विद्यार्थ्यांची गुणवत्ता चांगली असल्याचे दिसून येते,' असे तर्कट राज्य अभ्यासक्रम आराखड्यात लावण्यात आले आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT